# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,
## कार्यवृत्तांत

**दि. २१ जूलै, २०१५** रोजी **प्रा. डॉ. एस. पी. गोविंदवार** यांच्या अध्यक्षतेखाली **डीएसटी पर्स फेज २** या योजने संदर्भातील बैठक विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१) **प्रा. डॉ. एस. पी. गोविंदवार - अध्यक्ष**
२) **प्रा. डॉ. पी. एस. पाटील - सदस्य**
३) **प्रा. डॉ. (श्रीमती) एस.एच. ठकार- सदस्या**
४) **प्रा.डॉ. एस. एस. कोळेकर - सदस्य**
५) **प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे - सदस्य**
६) **डॉ. जी. एस. कुलकर्णी- सदस्य**
(७) **प्रा. डॉ. डी. व्ही. मुळे - सदस्य**
(८) **प्रा. डॉ. आर. के. कामत- सदस्य**
(९) **प्रा. डॉ. पी. डी. राऊत - सदस्य**
(१०) **प्रा. डॉ. (श्रीमती) एन. एस. चव्हाण - सदस्या**
(११) **प्रा. डॉ. के. डी. सोनावणे- सदस्य**

सदर बैठकीमध्ये खालील प्रमाणे कामकाज करण्यात आले.

१) डीएसटी पर्स फेज २ अंतर्गत विज्ञान अधिविभागाकडून मागविण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी अद्याप प्रस्ताव प्राप्त न झालेल्या अधिविभागांना प्रस्ताव तात्काळ महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागास सादर करण्याविषयी कळविण्यात यावे.

२) सदर योजने अंतर्गत विज्ञान अधिविभागाकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी ही समितीमधील सदस्यांकडून करुन घेवून प्रस्तावामध्ये काही त्रुटी आढळल्यास ती पूर्तता तात्काळ करुन घेण्यात यावी.

३) डीएसटी पर्स फेज २ संदर्भात प्रस्तावाचा प्राप्त विहीत नमुना अधिविभागांना पाठवून देवून सदर विहीत नमुन्यात एका पानावर तयार करण्याविषयी अधिविभागांना कळविण्यास सांगण्यात आले.

४) कन्टींजन्सी या शिर्षकामधून जाहिरात देताना अधिविभागांना त्यांची गरज व आवश्यकता लक्षात घेवून रिक्त जागांची जाहिरात ही एकत्र देण्याविषयी ठरले. जेणकरुन वारंवार होणारा खर्च व वेळ कमी होईल या अनुषंगाने सदरचा ठराव करण्यात आला.

५) पीआयजी ग्रुप ची बैठक ही दर सहा महिन्यानी घेवून सदर योजनेंतर्गत झालेल्या खर्चाचा ताळमेळ व प्रगती अहवाल व इतर अनुषंगिक गोष्टी सादर करण्याविषयी ठरले.

६) सदर योजनेचा प्रस्ताव हा ₹.३० कोटीच्या अनुषंगाने ज्या त्या शिर्षकाखाली अनुदानाचे वितरणाचा प्रस्ताव हा Justification सह फेर सादर करण्याविषयी अधिविभागांना कळवावे.

७) रिसर्च ग्रँटसाठी विज्ञान अधिविभागातील कायम शिक्षक (Permanent Teacher) यांना प्रत्येकी ₹.३ लाख इतकी रक्कम ही लहान उपकरणे खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आली.

८) डीएसटी पर्स फेज २ च्या मार्गदर्शक तत्वामधील मुद्यांनुसार तसेच डीएसटीने दिलेल्या विहीत नमुन्यात असणाऱ्या मुद्यांनुसार समितीने (Performance Bases वर) खालील प्रमाणे ₹.३० कोटीचे विभाग निहाय अंदाजीत वितरण केले आहे.

**A) Flexible Cost या मधील ₹.२५.५० कोटी पैकी**

***i) Hardware Cost : ₹.२०.०० कोटी***

a) Equipment and Research Facility साठी ₹. १८.०० कोटी

b) Computer and Networking साठी ₹. २.०० कोटी

ii) Consumable साठी ₹. ५.५० कोटी

**B) Fixed Cost या मधील ₹.४.५० कोटी पैकी**

i) Manpower : ₹. ३.०० कोटी

ii) Domestic Travel : ₹. ३० लाख (प्रत्येक अधिविभागासाठी ₹.१.५० लाख तरतूरद प्रत्येक विज्ञान अधिविभागासासाठी करण्यात आली.)

iii) Contingency, Maintenance, Organizing or Attending conference/ workshop साठी ₹. १.२० कोटी ची तरतूद करण्यात आली. (प्रत्येक अधिविभागासाठी ₹. ६.०० लाख तरतूरद प्रत्येक विज्ञान अधिविभागासासाठी करण्यात आली.)

९) विज्ञान अधिविभागातील प्रत्येक अधिविभागास Equipment and Research Facility साठी मुलभूत अनुदान (Basic Grants) या शिर्षकाखाली खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात आले.

a) प्रत्येक अधिविभागास ₹.२५ लाखाची तरतूद करण्यात आली म्हणजे एकूण १८ अधिविभागांना ₹. ४.५० कोटी इतकी तरतूद आहे.

b) ज्या अधिविभागामध्ये सॅप ही योजना कार्यरत आहे अशा अधिविभागांना ₹. २५ लाख हे अधिक देण्याविषयीची तरतूद करण्यात आली.

c) ज्या अधिविभागामध्ये फिस्ट ही योजना कार्यरत आहे अशा अधिविभागांना ₹. २५ लाख हे अधिक देण्याविषयीची तरतूद करण्यात आली.

१०) विज्ञान अधिविभागातील h:Index च्या गुणानुक्रमानुसार खालील प्रमाणे वर्गीकरण करुन त्यानुसार अनुदानाची तरतूद करण्यात आली.

- १-५ : ₹. ५ लाख
- ६-१० : ₹. १० लाख
- ११-१५ : ₹. २० लाख
- १६-२० : ₹. ३० लाख
- २१-२५ : ₹. ४० लाख

११) विज्ञान अधिविभागातील कार्यरत असणाऱ्या नियमीत शिक्षकांचे त्यांचे प्रसिध्द होणारे नियतकालीका, पेपर्स, व इतर घटक यांचे गुणानुक्रमानुसार वर्गीकरण करुन खालीलप्रमाणे अनुदानाची तरतूद करण्यात आली.

- १-५० : ₹. १० लाख
- ५१-१०० : ₹. १५ लाख
- १०१-१५० : ₹. २० लाख
- १५१-२०० : ₹. २५ लाख
- २०१-२५० : ₹. ३० लाख
- २५१-३०० : ₹. ३५ लाख
- ३०१- वरील : ₹. ४० लाख

१२) सदर योजनेत समाविष्ट असणारे अधिविभागांची पहिल्या वर्षातील कामगीरी (Performacne) च्या आधारे पुढील वर्षातील तरतूदीमध्ये योग्य ते बदल करण्यात येतील.

१३) शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान अधिविभागामध्ये असेलेल्या मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या पाच वर्षात पूर्ण झालेल्या पीएच.डी विद्यार्थ्यांच्या गुणानुक्रमानुसार खालीलप्रमाणे वर्गीकरण करुन अनुदानाची तरतूद करण्यात आली.

- १-५ : ₹. १० लाख
- ६-१० : ₹. २० लाख
- ११-१५ : ₹. ३० लाख
- १६ - वरील : ₹. ४० लाख

१४) डीएसटी पर्स फेज २ च्या मार्गदर्शक तत्वामधील Manpower या शिर्षकास ₹. ३ कोटीची तरतूद करण्यात आली. या अनुषंगाने Research Assistance साठी मागील वर्षात ₹. ८,०००/- च्या ऐवजी युजीसीच्या Project Fellows च्या मान्यतेप्रमाणे ₹. १६,०००/- प्रति महिना इतके मानधन देण्याविषयी नमुद केले आहे. तसेच सदर योजनेसाठी प्रशासकीय कामकाज करण्यासाठी संगणक केंद्रास २ टेक्नीकल असिस्टंट व महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागास २ कनिष्ठ सहाय्यक तथा संगणक चालक या जागा संबंधीत विभागास पूरविण्याविषयी ठरले.

१५) डीएसटी पर्स यांनी प्रस्ताव सादर करण्यासाठी दिलेल्या विहीत नमुन्यामध्येच प्रस्ताव महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागामध्ये तात्काळ सादर करण्याविषयी ठरले. विज्ञान अधिविभागाकडून आलेली माहितीचे एकत्रीकरण करुन ती माहिती प्रस्तावामध्ये समावेश करुन प्रस्ताव डीएसटी येथे पाठविण्याविषयी ठरले.

१६) Travel Grants या शिर्षकामधून सदर योजनेत समाविष्ट असणाऱ्या विज्ञान अधिविभागास प्रत्येकी ₹. १.५० लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.

या प्रकारे प्रस्तावास आवश्यक असणाऱ्या मुद्दयांचे विश्लेषण करुन प्रस्तावामध्ये अनुदानाची अंदाजीत तरतूद करण्यात आली. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या व समितीमधील अन्य सदस्यांच्या सुचनेनुसार Food Science and Technology अधिविभागाचे समन्वयक डॉ. ए. के. साहू व संगणक केंद्राचे संचालिका श्रीमती. एस. ए. खराडे यांना सध्या व भविष्यात Maintanance साठी व इतर गोष्टींसाठी आवश्यक अनुदानाच्या तरतूदीसाठीचा with justification सह प्रस्ताव महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागाकडे तात्काळ सादर करण्याविषयी सुचविण्यात आले. बैठकीच्या शेवटी योजनेचे अध्यक्ष प्रा. डॉ. एस. पी. गोविंदवार यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले व बैठक संपल्याचे घोषीत केले.

**श्री. एस. एम. कुबल**
**सदस्य सचिव**

**प्रा. डॉ. एस. पी. गोविंदवार**
**अध्यक्ष**